दिनांक : ०७.११.२०१९

**विषय : गृहपालन व्यवस्था ई-निविदा सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी ई निविदा करीता आयोजित निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त..**

गृहपालन व्यवस्था ई-निविदा सन २०१९-२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई निविदेसाठी निविदापूर्व बैठक दिनांक ०६.११.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता पीएमबी बिल्डींग, तिसरा मजला मजला येथे लेखाशाखेतील समिती कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

1. M/s National Security Services, Pune
2. M/s Sai Manpower Services Pvt. Ltd., Pune
3. M/s Principle Security & Allied Services Pvt. Ltd., Pune

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री. सतिश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री. सदाशिव पाटील, निबंधक
३. श्री देवराम शेळके, लेखाधिकारी व प्रापण प्रमुख
४. श्री विकास कटकधोंड, सहायक निबंधक
५. श्री. अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted आहे किंवा कसे या बाबतचा मुद्दा M/s National Security Services, Pune चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | MSME चे प्रमाणपत्र जर गृहपालन व्यवस्था सेवेसाठी नोंदणी केली असेल व प्रमाणपत्र upload केले तर EMD व निविदा शुल्क परत करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| २. | प्रत्येक वर्षी Turnover Certificate ५ कोटीचे सरसकट चालेल की फक्त हाऊसकिपिंग विषयीचेच असणे जरुरी आहे या बाबतचा मुद्दा M/s National Security Services, Pune. चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील प्रति वर्षाचे हाऊसकिपिंग विषयीचेच Chartered Accountant यांनी दिलेले वार्षिक ५ कोटीचे Turnover Certificate आवश्यक आहे. असे सांगण्यात आले. |
| ३. | Services Charges मध्ये कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव आहे, असा मुद्दा M/s Sai Manpower Services Pvt. Ltd., Pune चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | Monthly Wage Structure-Annexure A-२ मधील पार्ट- B मधील मुद्दा क्र. ०७ चे अवलोकन करुन दर भरणे आवश्यक आहे. सदर दरावर न्युनतम दर असलेली निविदा L-१ ठरणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले. |

(कृ.मा.प.)

(मागील पानावरुन)

| | | |
|---|---|---|
| ४. | कचऱ्याची विल्हेवाट कोण लावणार असा मुद्दा M/s National Security Services, Pune. चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | कचऱ्याची संबंधित ठेकेदाराने संस्थेच्या आवाराबाहेर जबाबदारीने मनपा नियमानुसार विल्हेवाट लावणे त्यांचेवर बंधनकारक आहे.असे स्पष्ट करण्यात आले. |
| ५. | Wage Structure मध्ये काही बदल झाल्यास (उदा. D.A.) त्याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे का असा मुद्दा M/s National Security Services, Pune. चे प्रतिनिधी यांनी यांनी उपस्थित केला. | Wage Structure मध्ये शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार, अनुज्ञेयता तपासून देयक अदा केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| ६. | BoQ मध्ये न्युनतम दर कसे भरायचे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | BOQ मधील दर Excel मध्ये कशा पदधतीने भरावयाचे याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच निविदेत नमूद केल्यानुसार Excel sheet मधील दर हे L-१ साठी ग्राह्य धरण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले. |

निविदा भरणे अगोदर संबंधित सर्व निविदादारांनी संपूर्ण निविदेचे काळजीपूर्वक वाचन करुन, सर्व कागदपत्रे निविदेतील मागणीनुसार upload करण्याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने सर्व निविदादारांच्या प्रतिनिधींना सूचना देवून बैठक समाप्त करण्यात आली.

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

विकास कटकधोंड
(सहायक निबंधक)

देवराम शेळके
(लेखाधिकारी व प्रापण प्रमुख)

सदाशिव पाटील
(निबंधक)

सतिश तडकसे
(वित्तीय सल्लागार)